सबसे ‘तेज’ ग्लोबल महातेज...!

# ग्लोबल महातेज

१ स्वागत मूल्य रु.

https://epaper.globalmahatej.com/

वर्ष १ ले | अंक : ३३ | मंगळवार, दि. २८ ऑक्टोबर २०२५ | पाने : ४+६ पानी दीपावली विशेषांक | अमळनेर | किंमत : १ रु. | Email - globalmahatej@gmail.com

### निवेदन

आजच्या अंकासोबत ६ पानी इंपोर्टेड ग्लेझ कागदाचा दीपावली विशेषांक देत आहोत. वाचक, वितरक, जाहिरातदार व हिंतचिंतक यांनी नोंद घ्यावी.

– संपादक

### गर्व से कहो स्वदेशी है हम...! स्वदेशी ही खरिदेंगे हम...!!

स्वातंत्र्यपूर्व संग्रामातील स्वदेशीची हाक आता पुन्हा देवू या. नवरात्रोत्सवात आपण आदिमाया आदिशक्तीचा जागर करतो त्याप्रमाणेच स्वदेशीचाही जागर करूया..! सच्च्या भारतीयांवर जेव्हा-जेव्हा परकीय आक्रमण होते तेंव्हा-तेंव्हा ते प्रचंड त्वेषाने पेटून उठतात...!! आता तीच वेळ येऊन ठेपली आहे...!!! जय भारत...! जय स्वदेशी...!!

### राज्यात २४ तासात पावसाचे संकट

महाराष्ट्रामध्ये पुन्हा एकदा अस्मानी संकट उभे ठाकले आहे. बंगालच्या उपसागरात सक्रिय मोंथा चक्रीवादळ आणि अरबी समुद्रातील कमी दाबाच्या प्रणालींमुळे पुढील २४ तासांत राज्यभरात पावसाची शक्यता वर्तवली गेली आहे. मोंथा चक्रीवादळ २८ ऑक्टोबरला आंध्र प्रदेशच्या काकीनाडा किनारपट्टीला आदळण्याची शक्यता आहे. या चक्रीवादळामुळे महाराष्ट्रातील काही भागातही पावसाची शक्यता आहे.

## अमळनेर ग्रामीण रुग्णालयातील स्वच्छताच कोमात...!

## आरोग्य केंद्रातच रुग्णांच्या आरोग्याशी उघडपणे खेळ...!!



**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेरच्या ग्रामीण रुग्णालयातील घाणीची एकूणच स्थिती पाहता तेथील स्वच्छताच जणू कोमात गेली आहे. ग्रामीण रुग्णालय म्हणजे खऱ्या अर्थाने आरोग्य केंद्र आहे. मात्र, याच आरोग्य केंद्रात स्वच्छतेचे तीन- तेरा वाजल्याने रुग्णांच्या आरोग्याशीच जणू उघडपणे खेळ चालू असल्याचे दूर्देवी चित्र आहे. तेथील स्थायी स्वरुपातील व मानसेवी डॉक्टर आणि कर्मचाऱ्यांच्या अक्षम्य दूर्लक्षाचेच हे प्रतिक आहे.

रुग्णालयाची स्वच्छता व्यवस्था पार कोलमडली आहे. स्वच्छतागृहांची दयनीय अवस्था, तुटलेले बेड, कोरडेठाक पाण्याचे फिल्टर आणि सर्वत्र पसरलेली दुर्गंधी व घाण यामुळे रुग्ण आणि त्यांच्या नातेवाईकांना रुग्णालयात थांबणे मुश्किल होत आहे.

रुग्णालयातील स्वच्छतागृहांची अवस्था पाहून अंगावर शहारे येतात. दुर्गंधी एवढी तीव्र आहे की, आत शिरणे म्हणजे शिक्षा भोगल्यासारखे वाटते. पुरुषांसाठी स्वतंत्र शौचालय नाही, तर महिलांसाठी असलेलेही वापरण्यायोग्य नाहीत. पाण्याची सोय नसल्याने रुग्ण आणि नातेवाईक पिण्याच्या पाण्याच्या बाटल्या विकत घेऊन स्वच्छतागृह वापरत आहेत. काहींना नाकातोंडाला रुमाल बांधून आत जावे लागत आहे. रुग्णालयातील जलशुद्धीकरण यंत्र देखील गेल्या अनेक दिवसांपासून बंद आहे. त्यामुळे रुग्णांना स्वच्छ पिण्याच्या पाण्यासाठी जारवर अवलंबून राहावे लागते. मात्र, जार रिकामे झाल्यास रुग्णांना बाहेरून पाणी विकत आणावे लागते. हे दृश्य एखाद्या दुर्गम गावातले नव्हे, तर तालुक्याच्या प्रमुख रुग्णालयाचे आहे, हेच सर्वाधिक धक्कादायक आहे. रुग्णालयाच्या भिंतींवर गुटख्याच्या पिचकाऱ्यांचे थरवर थर आहेत. परिसरात साचलेले कचऱ्याचे ढिगारे आणि तुटलेले बेड हे सर्व पाहता रुग्णालय हे आरोग्य केंद्र नसून ‘रोगालय’ झाल्याची चर्चा रुग्णांच्या नातेवाईकांमधून होत आहे. काही वार्डातील गाद्या फाटलेल्या, जुजबी अवस्थेत असून, त्यावर झोपणे म्हणजे शिक्षाच होय. या परिस्थितीमुळे रुग्ण आणि त्यांच्या नातेवाईकांमध्ये प्रचंड असंतोष आहे. आर्थिक परिस्थितीअभावी खासगी रुग्णालयात अनेकांना उपचार घेणे शक्य होत नाही. त्यामुळे असे गरीब रुग्ण ग्रामीण रुग्णालयात उपचारासाठी येतात. मात्र, तेथे गेल्यावर जर ॲडमिट व्हावे लागले तर मात्र आपण उगीचच येथे आलो असे त्यांना वाटते. नाईलाजास्तव बरे होईपर्यंत सर्व प्रकारची सहनशक्ती वाढवून रुग्ण व त्यांचे नातेवाईक ग्रामीण रुग्णालयात थांबतात. उच्चपदस्थ अधिकारी आणि लोकप्रतिनिधींनी एकदा का होईना, या रुग्णालयाला भेट द्यावी आणि रुग्णालयाची दूर्दशा पहावी, अशी मागणी अनेक नागरिकांनी केली आहे.

### नक्षीदार खड्डे...!




गांधलीपुरा पोलीस चौकीसमोरील एकदम पक्क्या व दर्जेदार रस्त्याला पडलेले नक्षीदार खड्डे आणि त्यातील नयनरम्य स्वच्छ पाणी पाहून सारे खूश आहेत.

(छायाचित्र : रजनीकांत पाटील)

## जैन समाजाची एकी : १८६ लक्झरी कार खरेदी, २१ कोटींची बचत!

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

गुजरातमधील जैन समाजाने एकीचे बळ दाखवत एकाच वेळी १८६ लक्झरी कार खरेदी केल्या. जैन आंतरराष्ट्रीय व्यापार संघटनेने थेट कार उत्पादकांशी संपर्क साधून या डीलमध्ये २१ कोटी रुपयांची विक्रमी सूट मिळविली आहे.

जितो ही ६५ हजार सदस्य असलेली ना-नफा तत्त्वावर कार्यरत असलेली संस्था आहे. या खरेदीमध्ये बीएमडब्ल्यू, ऑडी आणि मर्सिडीजसारख्या लक्झरी ब्रँडच्या कारचा समावेश आहे, ज्यांची किंमत ६० लाख ते १.३ कोटी रुपये होती. या सामूहिक खरेदीमुळे प्रत्येक सदस्याला सरासरी ११ लाख २९ हजार रुपयांची सूट मिळाली, जी एका कुटुंबासाठी दुसरी कार खरेदी करण्याइतकी आहे. संघटनेचे उपाध्यक्ष हिमांशू शाह यांनी सांगितले, की बहुतांश कार गुजरातमधील जैन समुदायाच्या सदस्यांनी खरेदी केल्या आहेत. जितोने केवळ सुविधा पुरवठादार म्हणून काम केले असून, यातून त्यांना कोणताही आर्थिक लाभ झाला नाही. या उपक्रमाचे सूत्रधार नितीन जैन यांनी सांगितले, की जैन समाजाच्या एकीचा फायदा घेऊन मोठी सूट मिळविण्याची

पान ३ वर



## चेकवर सही करताना ही एक चूक पडू शकते महागात; आरबीआयचा नियम

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

आजही भारतात लाखो लोक आर्थिक व्यवहारांसाठी चेकचा वापर करतात. मात्र, चेकवरील स्वाक्षरी ही त्याच्या वैधतेसाठी सर्वांत महत्त्वाची बाब आहे. त्यामुळे ‘ कुठल्या रंगाच्या पेनने चेक लिहावा किंवा स्वाक्षरी करावी?’ हा प्रश्न अनेकांच्या मनात निर्माण होतो. सोशल मीडियावर अनेकदा चर्चा पाहायला मिळते, की काळ्या पेनने लिहिलेले चेक बँकेच्या स्कॅनिंग सिस्टीममध्ये वाचले जात नाहीत. त्यामुळे ते नाकारले जातात. परंतु हे एक गैरसमज आहे.

**आरबीआयचे स्पष्टीकरण**

भारतीय रिझर्व्ह बँकेच्या मार्गदर्शक तत्त्वांनुसार स्वाक्षरीसाठी कोणत्याही विशिष्ट रंगाची सक्ती केलेली नाही. म्हणजेच काळ्या, निळ्या किंवा हिरव्या पेनने चेक लिहिला अथवा सही केली तरी तो पूर्णपणे वैध मानला जातो. आरबीआयकडून स्पष्ट करण्यात आले आहे, की बँकेत चेक क्लिअर करण्यापूर्वी तो डिजिटल स्कॅन केला जातो.

या प्रक्रियेत तीन प्रतिमा घेतल्या जातात ग्रेस्केल फ्रंटकाळा-पांढरा फ्रंटकाळा-पांढरा बॅक. यादरम्यान शाई जितकी स्पष्ट दिसते तितके स्कॅनिंग अधिक प्रभावी होते. त्यामुळे बँकेला फक्त स्वच्छ आणि ओळखण्याजोगी शाई हवी असते.

### कोणता पेन वापरावा?



आरबीआयच्या नियमानुसार कायमस्वरूपी शाई असलेला पेन वापरणे अनिवार्य आहे. कारण जेल, स्केच किंवा इरेझेबल पेनने लिहिल्यास शाई पसरू शकते. स्कॅनिंगदरम्यान तपशील अस्पष्ट दिसू शकतात. त्यामुळे अशा चुका टाळण्यासाठी कायमस्वरूपी शाई वापरण्याचा सल्ला देण्यात आला आहे. काळ्या पेनने चेक लिहिण्यावर कोणतेही बंधन नाही. ग्राहक निळ्या, काळ्या किंवा हिरव्या पेनचा वापर करू शकतात. फक्त जेल किंवा स्केच पेन वापरणे टाळावे.चेक लिहिताना कायमस्वरूपी शाई वापरणे सुरक्षित आणि अधिकृत मानले जाते. म्हणजेच, तुमचा चेक फक्त पेनच्या रंगामुळे अडकणार नाही. तो फक्त स्पष्ट आणि शाश्वत शाईने लिहिलेला असावा एवढीच अट आहे.

## लाचखोर अधिकारी अन् ‘घाणखोर’ कार्यालय!

### जिल्हा परिषदेचे सिंचन कार्यालयाचा कारभार पुन्हा चव्हाट्यावर

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

जिल्हा परिषदेच्या सिंचन व बांधकाम विभागाच्या कार्यालयाचा परिसर घाणीच्या विळख्यात आहे. सरकारी कार्यालय म्हणजे शिस्त, स्वच्छता आणि नियम यांचे उदाहरण असावे, अशी अपेक्षा असते. मात्र, या कार्यालयाने पूर्णतः अपेक्षाभंग केलेला आहे. परिसरात कचऱ्याचे ढिगारे, उडणारा धूर, सिगारेटचे तुकडे आणि राखेचे अवशेष हेच या कार्यालयाचे रोजचे वास्तव बनले आहे. काही दिवसांपूर्वी याच कार्यालयातील एका अधिकाऱ्याला लाच घेताना रंगेहात पकडले आहे. लाचखोर अधिकारी आणि ‘घाणखोर’ कार्यालय म्हणून सर्व कारभार चव्हाट्यावर आला आहे.

आवारात दररोज निर्माण होणारा कचरा नियमितपणे उचलला जात नाही. उलटपक्षी, कचऱ्याला पेटवून दिला जातो. सकाळी ८ ते १० दरम्यान परिसरात धुराचे साम्राज्य निर्माण होते. रिक्षाचालक, व्यावसायिक आणि पादचारी यांचे डोळे, नाक, घसा या धुरामुळे जळजळतात. यामुळे नागरिक कामांसाठी कार्यालयात जाणेही टाळतात. काही दिवसांपासून जळालेल्या राखेचे ढिगारे तसेच पडून आहेत. स्वच्छतेसाठी नेमलेल्या कर्मचाऱ्यांकडूनही कोणतीही कार्यवाही होताना दिसत नाही. कार्यालयाच्या आवारातच सिगारेटचे तुकडे, प्लास्टिकच्या पिशव्या आणि कागदांचा पसारा सर्वत्र पसरलेला आहे. त्यामुळे शासकीय कार्यालयातच स्वच्छ भारत मोहिमेचा फज्जा उडाल्याचे दिसून येते.



विशेष म्हणजे, या कार्यालयात अधिकारी व कर्मचारी लोकांना उपलब्ध होत नाहीत. देवाण-घेवाणशिवाय लोकांची कामे होत नाहीत. याबाबत ग्लोबल महातेजने खळबळजनक वृत्त प्रसिद्ध केले होते. वृत्त प्रसिद्ध झाल्यानंतर लगेचच एका अधिकाऱ्याला लाच घेताना रंगेहात पकडण्यात आले होते. त्यामुळे या कार्यालयावर नागरिकांचा विश्वास आधीच कमी झालेला आहे. आता ही अस्वच्छता म्हणजे केवळ अधिकाऱ्यांच्या निष्काळजीपणाचा नमुना बनले आहे. कार्यालयास कोणी वाली आहे का? असा प्रश्न उपस्थित करून नागरिकांनी जिल्हा प्रशासनाकडे स्वच्छता मोहिमेसह चौकशीची मागणी केली आहे. संबंधित अधिकाऱ्यांवर कारवाई करून कार्यालय परिसर स्वच्छ ठेवण्यात यावा, अन्यथा आंदोलनाचा इशारा देण्यात आला आहे.



# कोणी वडिलांसाठी, तर कोणी बिझनेससाठी शिक्षण सोडले...

## भारतातील टॉप टेन श्रीमंत उद्योगपतींचे शिक्षण किती?

ग्लोबल महातेज वृत्तसेवा

भारतातील अब्जाधीश उद्योगपतींच्या यशोगाथा प्रेरणादायी आहेत. मुकेश अंबानी, गौतम अदानी आणि झेप्टोचे कैवल्य वोहरा यांसारख्यांनी उच्च शिक्षण अर्धवट सोडले, तर रोशनी नाडर मल्होत्रा आणि कुमार मंगलम बिर्ला यांसारख्यांनी पदव्युत्तर पदव्या पूर्ण केल्या.

भारतातील हे श्रीमंत उद्योगपती तरुण नवउद्योजक आणि अनुभवी व्यावसायिकांचे मिश्रण दर्शवितात. यात उच्चशिक्षितांपासून ते कॉलेज ड्रॉपआऊट्सपर्यंतचा समावेश आहे. चला, जाणून घेऊया त्यांच्या शिक्षणाच्या प्रवासाबद्दल...












**१)मुकेश अंबानी** (रिलायन्स इंडस्ट्रीज)
देशातील सर्वांत श्रीमंत व्यक्ती. मुंबई विद्यापीठातून केमिकल अभियांत्रिकीची पदवी घेतली. स्टॅनफोर्ड विद्यापीठातून एमबीए सुरू केले. मात्र वडिलांच्या व्यवसायात मदत करण्यासाठी सोडले.

**२) गौतम अदानी (अदानी ग्रुप)**
अहमदाबादमध्ये प्राथमिक शिक्षण. वयाच्या १६ व्या वर्षी शाळा सोडली. गुजरात विद्यापीठात कॉमर्सच्या दुसऱ्या वर्षात प्रवेश, पण बिझनेस संधीसाठी सोडले.

**३) रोशनी नाडर मल्होत्रा** (एचसीएल टेक)
अमेरिकेतील नॉर्थवेस्टर्न युनिव्हर्सिटीमधून कम्युनिकेशनमध्ये बॅचलर पदवी. केलॉग स्कूल ऑफ मॅनेजमेंटमधून एमबीए पूर्ण. शिक्षणातील योगदानासाठी अनेक पुरस्कार मिळविले.

**४) सायरस एस. पुनावाला** (सीरम इन्स्टिट्यूट)
पपासून पुण्यात प्राथमिक शिक्षण. बृहन महाराष्ट्र कॉलेज ऑफ कॉमर्स (बीएमसीसी) मधून पदवी. पुणे विद्यापीठातून पीएच.डी. लस निर्मिती आणि समाजसेवेसाठी ऑक्सफर्ड आणि मॅसॅच्युसेट्स विद्यापीठांकडून मानद डॉक्टरेट.

**५) कुमार मंगलम बिर्ला** (आदित्य बिर्ला ग्रुप)
मुंबईतून पदवी. लंडन बिझनेस स्कूलमधून एमबीए. चार्टर्ड अकाउंटंट (सीए) आणि लंडन बिझनेस स्कूलचे मानद फेलो.

**६) नीरज बजाज (बजाज ग्रुप)**
मुंबईतून वाणिज्य (कॉमर्स) पदवी. बोस्टन येथील हार्वर्ड बिझनेस स्कूलमधून एमबीए पूर्ण.

**७) दिलीप संघवी (सन फार्मा)**
कोलकता विद्यापीठातून वाणिज्य शाखेची पदवी.

**८) अझीम प्रेमजी (विप्रो)**
स्टॅनफोर्ड विद्यापीठातून इलेक्ट्रिकल अभियांत्रिकीची पदवी.

**९) शाश्वत नाकराणी (भारतपे)**
आयआयटी दिल्लीतून टेक्स्टाइल टेक्नॉलॉजीची पदवी. वयाच्या १९ व्या वर्षी कंपनी स्थापन केली.

**१०) कैवल्य वोहरा (झेप्टो)**
मुंबईत संगणक अभियांत्रिकी सुरू. स्टॅनफोर्ड विद्यापीठात संगणक शास्त्रासाठी गेले. पण बिझनेससाठी सोडले. वयाच्या १९ व्या वर्षी आदित पालिचासोबत झेप्टो स्थापन केली. (अरविंद श्रीनिवास आयआयटी मद्रासमधून दुहेरी अभियांत्रिकी पदवी, यूसी बर्कलेतून संगणक विज्ञानात पीएच.डी. हेही उल्लेखनीय. टॉप १० मध्ये समावेश समायोजित.)

हे उदाहरण दाखविते, की यशासाठी फक्त पदवी नाही, तर दृष्टी, मेहनत आणि संधी महत्त्वाच्या आहेत . शिक्षण सोडले तरीही त्यांनी जग बदलले.



## तुम्ही दिवसभरात किती पाणी प्यायला हवे?

ग्लोबल महातेज वृत्तसेवा

आपल्या शरीराच्या वजनात जवळपास ६० टक्के पाण्याचा समावेश आहे. शरीरातील बहुतांश क्रियांसाठी पाण्याची गरज असते. पेशींपर्यंत पोषक घटक पोहोचविणे, अनावश्य पदार्थ बाहेर टाकणे, जेवण पचविणे अशा क्रियांसाठी पाणी लागते. शरीरात पाणी कमी झाले, तर डिहायड्रेशन, गोंधळ आणि चक्कर येण्यासारख्या समस्या येऊ शकतात. त्यामुळे पुरेशा प्रमाणात पाणी प्यायलाच हवे. शरीराला किती पाणी हवे, हे अनेक गोष्टींवर अवलंबून असते. यात वजन, शरीराचा आकार, तापमान, शारीरिक हालचाली आदी.

संशोधनानुसार एका व्यक्तीने दिवसभरात ८ ग्लास पाणी प्यायला हवे. पुरुषांनी ३ लिटर पाणी प्यायला हवे. महिलांनी दिवसभरात २ लिटर पाणी प्यायला हवे. मुलांनी दिवसभरात ६ ते ८ कप पाणी प्यायला हवे. गर्भवती महिलांनी दिवसभरात १० ते १२ ग्लास पाणी प्यायला हवे. तुम्ही जर शारीरिक हालचाली जास्त करत असाल आणि उष्ण वातावरणात राहत असाल, तर तुम्ही जास्त पाणी प्यायला हवे. किडनी किंवा हृदयांचा आजार असेल. तुम्ही डॉक्टरांच्या सल्ल्यानुसार पाणी प्यायला हवे.

तुमचे तोंड आणि घसा लवकर कोरडा पडत असेल किंवा लघवीचा रंग पिवळा दिसत असेल, तर तुमचे शरीर डिहायड्रेड झाले आहे. शरीराच्या सर्व भागांना कार्यरत ठेवण्यासाठी तुम्ही दररोज सकाळी उठल्यानंतर लगेच २ ग्लास पाणी प्यायला हवे. पचनक्रिया सुधारण्यासाठी जेवणाआधी अर्धा तास आधी १ ग्लास पाणी प्या.

## सिमेंटला मराठीत काय म्हणतात? ९०% लोकांना माहितीच नाही!

ग्लोबल महातेज वृत्तसेवा

बांधकामात सिमेंट हा अत्यंत महत्त्वाचा घटक आहे. आपण रोज सिमेंट हा इंग्रजी शब्द वापरतो. पण त्याला मराठीत काय म्हणतात हे अनेकांना माहिती नसते. लहान मुलांपासून मोठ्यांपर्यंत सर्वजण हा शब्द सहज वापरतात. मात्र त्याचा मराठी अर्थ फार कमी लोकांना ठाऊक आहे. चला, जाणून घेऊया सिमेंटला मराठीत काय म्हणतात आणि यामागील काही रोचक माहिती.

**सिमेंट म्हणजे काय?**
सिमेंट हे चुनखडी आणि इतर खनिजांपासून बनवलेले मिश्रण आहे. ज्याचा उपयोग बांधकामात विटा, दगड आणि काँक्रीट जोडण्यासाठी केला जातो. हे मिश्रण पाण्यासोबत मिसळल्यावर कठीण बनते आणि बांधकामाला मजबुती देते.

**सिमेंटला मराठीत काय म्हणतात?**
मराठीत सिमेंटला ‘ वज्रचूर्ण ’ असे म्हणतात. हा शब्द शासकीय व्यवहार, तांत्रिक दस्तऐवज आणि औपचारिक संदर्भात वापरला जातो. ‘ वज्र ’ या शब्दामुळे सिमेंटच्या मजबुतीचे आणि टिकाऊपणाचे वर्णन होते, तर ‘ चूर्ण ’ म्हणजे त्याची पावडर स्वरूपातील रचना.

**इतर इंग्रजी शब्दांचे मराठी पर्याय**
आपण रोज अनेक इंग्रजी शब्द वापरतो. ज्यांचे मराठी पर्याय माहिती नसतात. यापैकी काही उदाहरणे– कॉम्प्युटर : संगणक, रोड : रस्ते, स्टेशन : स्थानक, गॅस : वायू, कॅलेंडर : दिनदर्शिका.



सिमेंटसारखे इंग्रजी शब्द आपल्या रोजच्या संभाषणात रुजले आहेत. परंतु त्यांचे मराठी पर्याय जाणून घेणे आपली भाषा समृद्ध करते. वज्रचूर्ण हा शब्द सिमेंटच्या महत्त्वाला साजेसा आहे. पुढच्या वेळी बांधकामाविषयी बोलताना हा मराठी शब्द वापरून पाहा.



## ‘ मी टिपिकल बाईसारखी आहे ’

### रिंकू राजगुरूचा साधेपणा आणि स्वयंपाकाची आवड

ग्लोबल महातेज वृत्तसेवा

‘ सैराट ’ चित्रपटातून घराघरांत पोहोचलेली अभिनेत्री रिंकू राजगुरू पुन्हा एकदा तिच्या साध्या आणि प्रामाणिक स्वभावामुळे चर्चेत आहे. एका मुलाखतीत रिंकूने तिच्या वैयक्तिक आयुष्याबद्दल आणि घरातील कामांबद्दल मोकळेपणाने बोलताना सांगितले, की ‘ मी टिपिकल बाईसारखी आहे.’ तिला देवपूजा, स्वयंपाक आणि घर स्वच्छ ठेवण्याची विशेष आवड आहे. ती म्हणाली, की माझी देवपूजा आणि स्वयंपाक मी स्वतः करते. मला घर स्वच्छ हवे असते.

**स्वयंपाकाची आवड**
कामाच्या व्यस्ततेमुळे रोज सगळी कामे करणे शक्य नसले, तरी स्वयंपाकासाठी रिंकू स्वतः वेळ काढते. ती म्हणाली, की रोज सगळे शक्य होत नाही. त्यामुळे काही कामांसाठी ताई येतात. पण स्वयंपाक मला दुसऱ्याच्या हातचा आवडत नाही. तिला बनवता येणाऱ्या पदार्थांबद्दल ती म्हणाली, की नॉनव्हेज सोडून मला सगळे जमते. भाकरी, पिठले छान बनवते. पुरणपोळी थोडी-थोडी जमते. जेवण बनवणे मला सोपे वाटते, अवघड नाही. रिंकूचा हा साधा आणि ‘ टिपिकल भारतीय ’ अंदाज तिच्या चाहत्यांना खूप आवडला आहे. सोशल मीडियावर तिच्या या साधेपणाचे

**वर्कफ्रंट आणि सोशल मीडिया**
रिंकू सोशल मीडियावर सक्रिय असून, ती चाहत्यांना तिच्या वैयक्तिक आयुष्यासह नवीन प्रोजेक्ट्सच्या अपडेट्स देत असते. ‘ सैराट ’नंतर तिने ‘ कागर ’, ‘ झिम्मा २ ’, ‘ मेकअप ’, ‘ आठवा रंग प्रेमाचा ’ यांसारख्या मराठी चित्रपटांमध्ये काम केले आहे. तसेच, ‘ झुंड ’ आणि ‘ २०० हल्ला हो ’ या हिंदी चित्रपटांमधूनही तिने प्रेक्षकांची मने जिंकली आहेत. अभिनयासोबतच घरातील जबाबदाऱ्या आणि आवड जपणारी रिंकू खऱ्या अर्थाने प्रेरणादायी आहे.

### विनोदी किस्सा

**अशोक सराफ यांचा ‘ सिग्नलचा किस्सा ’**

एकदा अशोक सराफ पुण्यात ट्रॅफिक सिग्नलवर थांबले होते. एका ऑटोवाल्याने त्यांना ओळखले आणि म्हणाला, की सर, तुमचे सिनेमातले डायलॉग बोलू का?
सर म्हणाले, की बोल ना.
तो ओरडला, की आता काय करू? काही कळत नाहीये.
संपूर्ण सिग्नलवर लोक हसू लागले. अशोक सराफही हात जोडून म्हणाले, की बाबा, पुण्यात हसू थांबवणे अवघड आहे.



## २००० रुपये में जब आयएएस ने आयपीएस से की शादी साड़ी में दुल्हन की सादगी पर आया दिल

ग्लोबल महातेज वृत्तसेवा

क्या आप यूपीएससी की एक ऐसी जोड़ी को जानते हैं, जो २००० रुपये में शादी करके लाइमलाइट में आ गई। जिनकी न सिर्फ शादी की सादगी को लोगों ने पसंद किया, बल्कि दुल्हन बनीआईपीएस मोनिका का स्टाइल भी सबको भा गया। जिन्होंने शादी में लाल साड़ी पहन सादा- सिंपल रूप दिखाई, तो वह अक्सर वेस्टर्न कपड़ों में भी कमाल की लगती हैं। आयएएस और आयपीएस अधिकारियों की लव स्टोरी अपने कम ही सुनी होंगी और उनकी शादी भी कम ही देखी होंगी। जहां लोग अपनी शादी में लाखों- करोड़ों रुपये खर्च कर देते हैं, तो इस अफसर जोड़ी ने २००० रुपये से भी कम में शादी करके मिसाल कायम कर दी थी। तभी तो उनकी शादी का हल्ला पूरे देश में मचा और हर कोई दुल्हनिया की सादगी का कायल हो गया। यहां हम जिस कपल की बात कर रहे हैं, वो कोई और नहीं बल्कि आयएएस युवराज मरमट और उनकी बीनी आयपीएस मोनिका हैं, जिन्होंने बिना किसी शोर- शराबे के ही एक- दूजे का हाथ थाम लिया। अब जहां उनकी शादी की सिंपलिसिटी और फिजूलखर्ची से दूरी को लोगों ने पसंद किया, तो साथ ही अफसर बीवी मोनिका का सिंपल ब्राइडल लुक भी पसंद आ गया।



## रोहित शर्माची नवी टेस्ला कार : खास नंबर प्लेटमागील भावनिक कहाणी

ग्लोबल महातेज वृत्तसेवा

टीम इंडियाचा माजी कर्णधार आणि धडाकेबाज फलंदाज रोहित शर्मा सध्या त्याच्या नव्या टेस्ला कारमुळे चर्चेत आहे. काही महिन्यांपूर्वी रोहितने एका तरुणाला आपली कार भेट देऊन सोशल मीडियावर कौतुक मिळविले होते. आता त्याने टेस्ला कंपनीची नवी कोरी कार खरेदी केली आहे. या कारचा खास नंबर प्लेट (एमएच०१एफबी३०१५) सोशल मीडियावर व्हायरल झाला आहे. या नंबर प्लेटमागील कहाणी रोहितच्या वैयक्तिक आयुष्याशी जोडलेली आहे. त्यातील शेवटचे चार अंक (३०१५) त्याच्या मुलांच्या जन्मतारखांचे प्रतीक आहेत.

**टेस्ला कार आणि व्हायरल व्हिडिओ**
काळी टोपी आणि काळा टी-शर्ट परिधान केलेल्या रोहितचा टेस्ला कार चालवतानाचा व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल झाला आहे. कारच्या नंबर प्लेटवरील ३०१५ हा नंबर विशेष आहे. यातील ३० आणि १५ हे दोन अंक अनुक्रमे रोहितच्या मुलीच्या आणि मुलाच्या जन्मतारखेशी संबंधित आहेत. ही भावनिक निवड चाहत्यांमध्ये चर्चेचा विषय बनली आहे.

**नंबर प्लेटमागील खास कहाणी**
रोहित शर्माने डिसेंबर २०१५ मध्ये रितिका सजदेहसोबत लग्न केले. ३० डिसेंबर २०१८ रोजी त्यांना मुलगी समायरा झाली, जी आता लवकरच ६ वर्षांची होईल. त्यानंतर १५ नोव्हेंबर १०१४ रोजी रितिकाने मुलाला जन्म दिला. जो आता एक वर्षाचा होणार आहे. टेस्ला कारच्या नंबर प्लेटवरील ३०१५ हा नंबर समायरा (३०) आणि त्याच्या मुलाच्या (१५) जन्मतारखांचे संयोजन आहे. या खास निवडीमुळे रोहितच्या चाहत्यांनी त्याच्या कुटुंबावरील प्रेमाचे कौतुक केले आहे.

**क्रिकेट क्षेत्रातील पुढील पाऊल**
टी-२० क्रिकेटमधून निवृत्ती घेतल्यानंतर रोहित आता ऑस्ट्रेलियाविरुद्धच्या एकदिवसीय मालिकेसाठी सज्ज आहे. शुभमन गिलच्या नेतृत्वाखालील भारतीय संघ ऑस्ट्रेलियात मैदान गाजवणार आहे. ऑस्ट्रेलियात क्रिकेट खेळणे नेहमीच आव्हानात्मक आणि रोमांचक असते, असे रोहितने दौऱ्यापूर्वी सांगितले. दरम्यान, क्रिकेटसोबतच त्याची नवी टेस्ला कार आणि त्यामागील भावनिक कहाणी चाहत्यांचे लक्ष वेधत आहे.



हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक व मालक श्री. आनंद डिगंबर महाले यांनी महातेज पब्लिकेशनसाठी अविष्कार ग्राफिक्स, प्लॉट नं. 17, रामचंद्र नगर, भुसावळ रोड, जळगाव (महाराष्ट्र) 425002 येथे छापून गट नं. 160, प्लॉट नं. 51/52, सुप्रभा अपार्टमेंट, मराठा मंगल कार्यालयाजवळ, पटवारी कॉलनी, अमळनेर, जि. जळगाव (महाराष्ट्र) 425401 येथे प्रसिद्ध केले. संपादक :- आनंद डिगंबर महाले (रजि नं. MAHBIL/25/A0192), कार्यकारी संपादक श्री. भरत रघुनाथ पाटील ( पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची राहील.) या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यातून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक व कार्यकारी संपादक सहमत असतीलच असे नाही. महातेज पब्लिकेशन तथा ग्लोबल महातेज संबंधित कोणतेही वाद तथा खटले फक्त अमळनेर न्यायालयातच चालविले जातील. संपर्क : 7011004040, 7011004242, ई-मेल : globalmahatej@gmail.com



# प्लास्टिक पिशव्यांचा अमळनेरला पुन्हा सर्रास वापर

## जनावरांच्या आरोग्याचा प्रश्न ऐरणीवर; पालिका प्रशासनाने कडक मोहीम राबवण्याची गरज

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

राज्य शासन आणि केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळाने १ जुलै २०२२ पासून 'सिंगल यूज' प्लास्टिकवर कडक बंदी लागू केली आहे. सुरुवातीला पालिकेकडून बाजारपेठांमध्ये प्लास्टिक विक्रेत्यांवर धाड टाकून दंडात्मक कारवाई झाली होती. मात्र, त्यानंतर ही मोहीम थंडबस्त्यात आहे. दिवाळी खरेदीच्या धामधुमीत पुन्हा सर्रास प्लास्टिकचा वापर सुरू झाल्याचे दिसून येत आहे. पालिकेने पुन्हा ही मोहीम सुरू करावी, अशी मागणी पर्यावरणप्रेमींनी केली आहे. शहरातील मुंबई गल्ली, पालिका हॉस्पिटल समोर, जुन्या वसाहती परिसरात प्लास्टीकच्या कचऱ्याचे ढिगारे साचले आहेत. या कचऱ्याच्या ढिगाऱ्यांजवळ जनावरे खाद्याच्या शोधात वावरताना दिसतात. प्लास्टिक व कुजकचरा खाण्यामुळे जनावरांचे आरोग्य धोक्यात आहे. कचऱ्यामुळे परिसरात दुर्गंधीही पसरली आहे. काही भागात कचरा जाळल्यानंतर वायू प्रदूषणही वाढले आहे.

**प्लास्टिक बंदी फक्त कागदावर**

बाजारात मोठे व्यापारी व किरकोळ विक्रेते खुलेआम सिंगल यूज प्लास्टिक पिशव्यांमध्ये वस्तू देताना दिसतात. प्रशासन याकडे जाणीवपूर्वक दूर्लक्ष करीत असल्याचा आरोप नागरिकांनी केला आहे. प्लास्टिकचे विघटन वर्षानुवर्ष होत नाही. यामुळे वायू, माती आणि जलप्रदूषणाचा स्तर वाढत आहे. नागरिकांच्या आरोग्यावरही याचा परिणाम होत आहे.

### नागरिक, प्रशासन दोघांची जबाबदारी !

पालिकेकडून विशेष पथकाकडून पुन्हा एकदा बाजारपेठांमध्ये मोहीम राबवावी. दुकानदारांची चौकशी करावी. प्लास्टिक पिशव्या आढळल्यास दंडात्मक कारवाई करावी. ग्राहकांमध्येही प्लास्टिक पिशव्यांऐवजी कापडी, कागदी पिशव्या वापराबाबत जनजागृती आवश्यक आहे. ही जबाबदारी पालिकेसह नागरिकांचीही आहे, अशा भावना पर्यावरणप्रेमींनी व्यक्त केल्या आहेत.

# वुल्फ पॅक : लांडगा ' लबाड ' नाही, तर आदर्श घ्यावा असा प्राणी!

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

' लबाड लांडगा ' असे आपण बालपणापासून ऐकत आलोय. परीक्षेतल्या गोष्टींतून, लोककथांतून लांडग्याला नेहमी धूर्त आणि विश्वासघातकी दाखवले गेले. मात्र खरोखर असे आहे का? वन्यजीव अभ्यासक याच्या उलट मत मांडतात. ते म्हणतात, की लांडगा हा खरा आदर्श आहे. त्याची वैशिष्ट्ये इतकी प्रेरणादायी आहेत, की आपण त्यांच्याकडून शिकायला हवे. चला, जाणून घेऊया लांडग्याची ही खरी बाजू. लांडगे सन्मानाने जगतात. ते कधीही मेलेले किंवा जुने अन्न खात नाहीत. त्यांच्यासाठी फक्त ताजी शिकार हाच पर्याय असतो. यातून त्यांचा आत्मसन्मान दिसतो. ' आत्मसन्मानाशिवाय जगणे म्हणजे जगणे नव्हे ' हा त्यांचा अनकहा नियम आहे. तुम्ही कधी लांडग्याला सर्कसमध्ये नाचताना पाहिले का? नाही ना! कारण टाळ्यांसाठी मनोरंजन करणे त्यांच्या स्वभावात नाही. ते शांतपणे नेतृत्व करतात आणि स्वतःच्या अटींवर जीवन जगतात. लांडग्यांचे प्रेम आणि निष्ठा तर आणखी प्रेरणादायी आहे. आयुष्यभर फक्त एकच साथीदार आणि त्याचे निधन झाल्यावर खरेखुरे दुःख. निष्ठा त्यांच्यासाठी फक्त शब्द नाही, तर प्रवृत्ती आहे. कुटुंबाबद्दलची ही निष्ठा फक्त प्रेमातच नाही, तर वृद्धांच्या आदरातही दिसते. शिकार करू न शकणाऱ्या वृद्ध लांडग्याला तरुण लांडगे स्वतःच्या तोंडातले अन्न देतात. ज्यांनी मोठे केले त्यांना कधी विसरत नाहीत. ही कृतज्ञता आपल्याला खूप काही शिकवते. अभ्यासक सांगतात, की ' Quiet Strength आणि निष्ठा जपा. लांडग्यासारखे जगा! ' ला ंडगा लबाड नाही, तो आदर्श आहे.



# आता चेक वटणार त्या दिवशीच!

## नवी इमेज-आधारित क्लीअरन्स प्रणाली स्थिर

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

देशातील बँकिंग व्यवहारांना गती देण्यासाठी सुरू करण्यात आलेली इमेज-आधारित चेक क्लीअरन्स प्रणाली आता पूर्णपणे स्थिर झाली आहे, असे नॅशनल पेमेंट्स कॉर्पोरेशन ऑफ इंडियाने जाहीर केले आहे. नॅशनल पेमेंट्स कॉर्पोरेशनच्या मते, नव्या प्रणालीअंतर्गत धनादेश बँकेत जमा केल्याच दिवशी वटतो. म्हणजेच चेक क्लिअरन्ससाठी प्रतीक्षा लागणार नाही. T+१ वरून T+० प्रणाली रिझर्व्ह बँकेच्या निर्देशांनुसार देशात ४ ऑक्टोबर २०२५ पासून पारंपरिक ' टी+१' बॅच प्रोसेसिंग प्रणालीऐवजी 'टी+०' सतत क्लीअरन्स प्रणाली लागू करण्यात आली आहे. याचा अर्थ आता चेक क्लिअरिंग बॅचप्रमाणे ठराविक वेळेत न होता दिवसभर सुरू राहील. ज्यामुळे प्रक्रिया अधिक वेगवान आणि पारदर्शक बनेल. सुरुवातीला




### ग्राहकांना मिळणार वेगवान सेवा

नव्या प्रणालीमुळे ग्राहकांना मोठा दिलासा मिळणार आहे. आता चेक जमा केल्यानंतर ती प्रक्रिया रिअल टाइममध्ये होईल. त्यामुळे बँकेत जमा केलेले चेक त्याच दिवशी वटणे शक्य होईल. व्यवहार प्रक्रियेत लागणारा वेळ आणि पैसा दोन्ही कमी होणार आहेत. एनपीसीआय सध्या उरलेल्या किरकोळ अडचणी सोडविण्यासाठी बँकांसोबत काम करत आहे. जेणेकरून प्रणाली संपूर्ण देशभर सुरळीत कार्यरत राहील.

**अडचणी, आता स्थिरता** एनपीसीआयने सांगितले, की सुरूवातीच्या काही दिवसांत काही बँकांना सॉफ्टवेअर आणि प्रशिक्षणासंबंधी तांत्रिक अडचणींना सामोरे जावे लागले. भारतीय स्टेट बँकेसह अनेक बँका नव्या प्रणालीसाठी पूर्णपणे तयार नव्हत्या. त्यामुळे काही ग्राहकांचे व्यवहार विलंबाने पार पडले. एनपीसीआयने स्पष्ट केले, की प्रारंभी तांत्रिक त्रुटींमुळे काही खात्यांमध्ये रक्कम जमा होण्यात विलंब झाला होता. मात्र आता बहुतांश समस्या दूर झाल्या आहेत.

### जैन समाजाची एकी :

पान १ वरून

कल्पना समाजासमोर मांडली गेली. कार उत्पादकांनीही या मोठ्या ऑर्डरला सकारात्मक प्रतिसाद दिला. कारण यामुळे त्यांचा मार्केटिंग आणि जाहिरातीवरील खर्च कमी झाला. या यशस्वी व्यवहाराने उत्साहित होऊन जितोने आता आपली व्याप्ती वाढवण्याचा निर्णय घेतला आहे. आता ' उत्सव ' नावाचा नवीन उपक्रम सुरू करण्यात आला आहे. या उपक्रमांतर्गत दागिने, टिकाऊ ग्राहक वस्तू आणि इलेक्ट्रॉनिक्स क्षेत्रातील प्रमुख ब्रँड्ससोबतही अशा सवलतींची व्यवस्था केली जाणार आहे. यामुळे भविष्यात जैन समाजाला या वस्तूंवरही मोठी सूट मिळेल.

# हजारचा संक्षिप्त उल्लेख '1K' असा का करतात?

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

आपण मराठीमध्ये १००० ला एक हजारच म्हणतो. मात्र इंग्रजीमध्ये मात्र हजारचा उच्चार जास्त करून 1K असा केला जातो. आपण मराठी माणसेही बऱ्याच वेळा बोलण्याच्या किंवा लिहिण्याच्या ओघात 2K, 5K, 10K असा उल्लेख करतो. तुमच्याही मनात कधीना कधी हा प्रश्न आला असेलच, की इंग्रजीमध्ये हजार म्हणजे THOU-SAND म्हणजे ' T ' हे अक्षर वापरायला हवेमग ' K ' हे अक्षर वापरण्याचे कारण ते काय?

खरेतर K हे अक्षर आठ अक्षरी THOUSAND या शब्दाच्या बदल्यात वापरात आले. तुमचा विश्वास बसणार नाही. मात्र हे खरे आहे, की हा बदल ग्रीक काळामध्ये घडला. म्हणजे अतिशय जुन्या काळात. ग्रीकांच्या राज्यात हजाराला THOUSAND न म्हणता ' CHIL-IOI ' म्हटले जायचे. CHIL-IOI चा खरा अर्थ आहे- अनंत काळ, म्हणजेच पाहायला गेले तर CHILIOI चा शब्दशः अर्थ ' हजार ' असा होत नाही. परंतु त्या काळी ग्रीक हजार ही संख्या सर्वोच्च मानत असत. त्यामुळे त्यांनी अनंतकाळाप्रमाणे अनंत संख्या या अनुषंगाने CHILIOI हा शब्द THOUSAND साठी वापरण्यास सुरूवात केली.

कालांतराने हा CHIL-IOI शब्द फ्रेंचांनी घेतला. त्याचे संक्षिप्त रूप ' KILO ' असे केले. फ्रेंचांनी पुढे मेट्रिक सिस्टीम सुरू केल्यावर त्यांनी KILO (किलो) म्हणजे १००० अशी नवीन संकल्पना अमलात आणली. या KILO चा फ्रेंच्यांच्या दृष्टीने अर्थ होता हजारामधील वाढ. उदा.- १०K म्हणजे १०x१००० = १०,००० व्यापाराच्या निमित्ताने जगभर पसरलेल्या फ्रेंच व्यापाऱ्यांमुळे ही संकल्पना हळूहळू सगळीकडे पसरत गेली. त्यानंतर किलोलीटर, किलोग्रॅम आणि किलोटन यासारख्या संज्ञा अस्तित्वात आल्या. याच कारणामुळे हजारसाठी संक्षिप्त शब्द म्हणून KILO मधील K हा शब्द वापरण्याची प्रथा सुरू झाली. आधुनिक युगाच्या अर्थशास्त्रामध्ये देखील K चा वापर असाच सुरू ठेवण्यात आला.

### जमिनीवर बसून जेवल्याचे फायदे

मांडी घालून बसल्याने पोटावर हलका दाब येतो. ज्यामुळे पचनक्रिया सुधारते आणि अन्न योग्य प्रकारे पचते. या स्थितीत शरीराच्या खालच्या भागातील रक्ताभिसरण वाढते. जे हृदयाच्या आरोग्यासाठी फायदेशीर ठरते. नियमितपणे मांडी घालून बसल्याने सांधे आणि स्नायूंमध्ये लवचिकता टिकून राहते. जमिनीवर बसल्याने मन शांत होते आणि जेवणावर अधिक लक्ष केंद्रित करता येते. या स्थितीत जेवण नैसर्गिकपणे हळू होते. त्यामुळे पोट भरल्याचे संकेत वेळेवर मिळतात.

# ' कॅमेरा 'चा मराठी अर्थ माहीत आहे का?

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

आजच्या काळात प्रत्येकाच्या हातात मोबाईल कॅमेरा आहे. क्षण टिपण्यासाठी आणि आठवणी जपण्यासाठी कॅमेरा आपल्यासाठी रोजचा भाग बनला आहे. पण ' कॅमेरा ' या इंग्रजी शब्दाचा मराठी पर्याय काय आहे, हे अनेकांना माहीत नसते. तज्ज्ञांच्या मते, कॅमेऱ्याला मराठीत ' छायाचित्र टिपण्याचे यंत्र ' असे म्हणतात. हा शब्द मराठी भाषेतील अधिकृत मान्यता प्राप्त पर्याय मानला जातो. काहीवेळा ' कॅमेरा ' हाच इंग्रजी शब्द देखील मराठी संभाषणात वापरला जातो. पण योग्य मराठी पर्याय म्हणजे ' छायाचित्र टिपण्याचे यंत्र '. पूर्वीच्या काळात घराघरांत फिल्म कॅमेरे असत. ९० च्या दशकात फोटो स्टुडिओची विशेष क्रेझ होती. कौटुंबिक समारंभ, सण-वार, लग्नसराई या सर्व प्रसंगी लोक स्टुडिओत जाऊन छायाचित्रे टिपवायचे. आज त्याच भूमिकेत स्मार्टफोनमधील उच्च दर्जाचे कॅमेरे आले आहेत. वैज्ञानिक दृष्ट्या पाहता कॅमेरा म्हणजे प्रकाशसंवेदी पृष्ठभाग असलेले एक साधन आहे. या पृष्ठभागावर रासायनिक थर असलेली फिल्म किंवा इलेक्ट्रॉनिक सेन्सर बसवला जातो. ज्यावर प्रकाशाचे प्रतिबिंब पडून छायाचित्र तयार होते. काळानुसार कॅमेऱ्यांची रचना आणि गुणवत्ता बदलली असली तरी छायाचित्रांची किंमत आजही तितकीच अमूल्य आहे.



# जगातील लुटीचा सर्वात मोठा, आव्हानात्मक व वेगवान गुन्हा

## ८ अब्ज ९५० कोटी १२ लाख ७ हजार ९०४ रुपयांच्या दागिन्यांची चोरी

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

चोरीच्या अनेक कथा आपण ऐकल्या असतील. आज ज्या चोरीबद्दल आपण बोलणार आहोत ती जगातील सर्वांत वेगवान आणि थरारक चोरी होती. फक्त चार मिनिटांत चोरट्यांनी तब्बल १०२ दशलक्ष डॉलर म्हणजेच सुमारे ८ अब्ज ९५० कोटी १२ लाख ७ हजार ९०४ रुपयांचे मौल्यवान दागिने लंपास केले. चोरीची थरारक कहाणीही घटना पॅरिसच्या प्रसिद्ध लूव्हर संग्रहालयात घडली. रविवारचा दिवस होता. पहाटे साडेनऊला संग्रहालय सर्वसामान्यांसाठी उघडले. काही वेळातच ही इतिहासातील सर्वांत मोठी आणि वेगवान चोरी पार पडली. चार चोर पिवळ्या रंगाच्या जॅकेटमध्ये संग्रहालयात घुसले. त्यांनी नियोजित पद्धतीने काही मिनिटांत सुरक्षा व्यवस्थेला चकमा दिला. संग्रहालय परिसरात प्रत्येक ठिकाणी रक्षक तैनात असतानाही त्यांनी पोलिस आणि सुरक्षा यंत्रणांना अक्षरशः गाफील ठेवले. चार मिनिटांत चोरट्यांनी मौल्यवान दागिन्यांवरील हात साफ केला. कोणालाही माग कळायच्या आत ते फरार झाले.



### चोरी कशी झाली?

